**पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणा-या विंधण विहिरींवर युपीव्हीसी केसिंग पाईप बसविण्यास परवानगी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय ग्रापापु १००४/प्र.क्र.२१७/पापु ०७**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक - ७ फेब्रुवारी, २००५**

**प्रस्तावना:-**

पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत विविध योजनांमधून पिण्याच्या पाण्यासाठी विंधण विहिरी घेण्यात येतात. सध्या या विंधण विहिरींवर **लोखंडी केसिंग पाईप** बसविण्यात येत आहे. आता बाजारात युपीव्हीसी प्रकारचा पाईप उपलब्ध झाला असून तो विंधण विहीरीवर बसविण्यात येणा-या लोखंडी केसिंग पाईपला पर्याय ठरु शकेल काय याचा अभ्यास करुन अहवाल सादर करण्याबाबत संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे यांना कळविण्यात आले होते.

२. त्यानुसार, संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे यांनी राज्यातील वेगवेगळया भूस्तरामध्ये युपीव्हीसी केसिंग पाईपचा वापर करुन त्याचा अभ्यास करुन शासनास अहवाल सादर केला आहे.

३. संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे यांनी केलेल्या शिफारशीनुसार राज्यात यापुढे विविध कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या विंधण विहिरींवर युपीव्हीसी केसिंग पाईप बसविण्यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन राज्यात पिण्याच्या पाण्यासाठी यापुढे विविध कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या विंधण विहिरींवर **युपीव्हीसी केसिंग पाईप** वापरण्यास शासन पुढील अटींच्या अधिन राहून मान्यता देत आहे :-

(१) १५० मि.मी.विंधण विहिरींकरिता वापरण्यात येणारा यूपीव्हीसी पाईप बीआयएस १२८१८ (१९९२) प्रमाणे असावा. ज्याची कमितकमी जाडी ५.७ मि.मी. व बाहेरील व्यास १६५.४ मि.मी.असावा.

(२) नागपूर विभागातील रुपांतरित खडकाचे भूस्तर तथा कोकण विभागातील जांभा खडकाच्या भूस्तरात यूपीव्हीसी केसिंग पाईपचा वापर करण्यात येवू नये.

(३) युपीव्हीसी केंसिगला किमान ६ मिटर्स पर्यंत व्यवस्थित ग्राऊटिंग करण्यात यावे.

(४) युपिव्हीसी पाईप, लोखंडी पाईपप्रमाणे यंत्राचे ड्रिलहेडने दाबता येत नसल्याने युपीव्हीसी केसिंग योग्यप्रकारे टाकण्याकरीता २०० मि.मी.व्यासाचे छिद्र स्वच्छ व साफ आहे याची खात्री करुन घेण्यात यावी.

(५) विंधण विहिर पूर्ण झाल्यानंतर हातपंप बसविण्याकरिता केसिंग पाईप तोडून विंधण विहिर खराब केली जाणार नाही याची काळजी घेण्यात यावी. त्यावर पीव्हीसीचा प्लग बसविण्यात यावा.

(६) कोरडया विंधण विहिरीवर नजीकच्या भविष्यात पंप बसणार नसल्याने अशा विंधण विहिरीचा पाईप जमिनीखाली २० से.मि.वर कापून त्यावर कॅप बसविण्यात यावी. जेणेकरुन हया विंधण विहिरींना पुढे पंप बसवावयाचा झाल्यास हया पाईपला ५० से.मि.लांबीचा तुकडा जोडता येईल.

(६) युपीव्हीसी पाईपचा प्रथमतः च वापर होणार असल्याने तो योग्य प्रतीचा आहे व तो योग्य प्रकारे विंधण विहिरीत टाकला गेला आहे याची खात्री करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुधीर ठाकरे)

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,
मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय मुंबई
एच-९०१(ए)-१अ
D:\G.R. Folder 2005\c.r. 217 - 1004.doc

विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व तहसीलदार
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.

---------